माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ५१/२०२०**

**तक्रारकर्ता श्री. प्रितम सुभाष शेट्टी**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (इ व का) जी/दक्षिण,**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहा.अभियंता (इ व का) यांचे कार्यालय,
जी/दक्षिण विभाग, १ ला मजला, ना.म.जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई -१३

**प्रथम अपिलीय अधिकारी**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहा.अभियंता (इ व का) यांचे कार्यालय,
जी/दक्षिण विभाग, १ ला मजला, ना.म.जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई -१३

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २३.०५.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ.नों. क्र. ५४२३/२०१८ रा.मा.आ. अपील क्र. १८४२/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. १६.०१.२०२० रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"अपिलार्थी यांनी दाखल केलेले व्दितीय अपील अर्ज कलम (१८) अंतर्गत तक्रार म्हणून रुपांतरीत करण्यात येत आहेत."*

उक्त आदेशानुषंगाने आयोगाने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) जी/दक्षिण, बृहन्मुंबई महानगरपालिका, लोअर परेल, मुंबई यांच्याकडून आयोगाने दि. ०३.०२.२०२० व दि.०४.१२.२०२० रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) जी/दक्षिण, बृहन्मुंबई महानगरपालिका, लोअर परेल, मुंबई यांनी त्यांचा अहवाल दि.१५.०२.२०२० आयोगासमोर सादर केला.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) जी/दक्षिण, बृहन्मुंबई महानगरपालिका, लोअर परेल, मुंबई यांनी तक्रारकर्ता यांना लिहिलेले पत्र दि. ०४.०१.२०२१ आयोगास सादर केलेले आहे. त्यामध्ये नमुद केलेले आहे की, *"आपल्या तक्रारीत नमूद इमारत चंद्रसागर इमारत, वरळी हिल रोड, वरळी, मुंबई- १८ या इमारतीमधील अनधिकृत बांधकामाची शहानिशा करण्याकरिता या कार्यालयामार्फत सोसायटीच्या अध्यक्ष / सचिव / सोसायटी यांजकडून मंजूर आराखड्याच्या प्रतींची मागणी करण्यात आली आहे. तसेच कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) शहर कार्यालयाकडे समसंदर्भ क्र. ACGS/१२१०/SR/BF दि. २८.०१.२०२० मागणी करण्यात आली आहे. परंतु आजमितीपर्यंत मंजूर आराखडे प्राप्त झाले नाहीत. त्यामुळे या समसंदर्भ क्र. ACGS/४४१/SR/BF कार्यालयामार्फत पुनश्च दि.३१.१२.२०२० रोजी स्मरणपत्र काढण्यात आले आहे. त्यामुळे या इमारतीची पाहणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे आपणास अपेक्षित असलेली माहिती निर्माण न झाल्यामुळे आपणास माहिती देता येत नाही."*

..२/-

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित असून तक्रारकर्ता यांनी असे सादर केले की, त्यांनी अनधिकृत बांधकाम विषयी तक्रार केली होती. त्यांना संबंधीत इमारतीची पाहणी अहवालची माहिती अपेक्षित आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सादर केले की, त्यांनी दि.३१.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये तक्रारकर्ता यांना कळविले आहे की, इमारतीची पाहणी करण्यात आलली नाही. त्यामुळे आपणास अपेक्षित असलेली माहिती निर्माण न झाल्यामुळे देता येत नाही.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना उत्तर देण्यात आलेले आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २७.०५.२०२५**